| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २५२ वा | शनिवार दिनांक २० डिसेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

भुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत सिंधुबाई रा. कल्याणनगर परधी पिढी ता. भुम जि. धाराशिव या दि.१८.१२.२०२५ रोजी आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे ७,००० किंमतीची ७०लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे गुन्हे नोंदविला आहे.

दुसऱ्या घटनेत ढोकी पोलीस ठाणे अंतर्गत आकाश रा. सारोळा भि. ता. जि. धाराशिव हे दि.१८.१२.२०२५ रोजी तेर गावातील वानेवाडी जानारे रोडवरील कॉर्नरवाडा ढाब्याचे समोर अंदाजे ६,६०५ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. तर श्रीकांत रा. बालाजी नगर धाराशिव ह.मु. तेर ता. जि. धाराशिव हे दि.१८.१२.२०२५ रोजी तेर गावातील वानेवाडी जानारे रोडवरील कॉर्नरवाडा ढाब्याचे समोर अंदाजे १,५२० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ३८ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये ढोकी पो ठाणे येथे स्वंतत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

तिसऱ्या घटनेत कळंब पोलीस ठाणे अंतर्गत सुनिता रा. शेरे गल्ली कळंब ता. कळंब जि. धाराशिव या दि.१८.१२.२०२५ रोजी मोहेकर चौक हावरगाव रोडच्या बाजूस आपल्या राहत्या घरासमोर मोकळ्या जागेत अंदाजे ४,००० किंमतीची५० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर गोरख रा. गायरान वस्ती ईटकुर ता. कळंब जि. धाराशिव हे दि.१८.१२.२०२५ रोजी २०.१५ वा.सु. आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २,५०० किंमतीची २५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे स्वंतत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

### शिराढोण परिसरात दोन मोटारीची चोरी

शिराढोण (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत प्रणित प्रकाश संगवे, वय ४५ वर्षे, रा.शिराढोण ता. कळंब जि. धाराशिव यांची शिराढोण शिवारातील शेत गट नं २९६ मधील पाच एचपीची मोटर, श्रीनिवास आदिनाथ नानजकर, यांची पाच एचपीची, गंगाधर भाउसाहेब सोमासे यांची पाच एचपीची सौर पंप असे दोन मोटारी असे एकुण ३१,००० किंमतीच्या चार मोटर अज्ञात व्यक्तीने चोरुन नेल्या. प्रथम खबरेवरुन शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालय येथे अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा



धाराशिव (जिमाका)-अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांची संस्कृती,भाषा,धर्म व परंपरा इत्यादीचे संवर्धन करण्यासोबतच त्यांच्या कल्याणासाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन आज १८ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती कार्यालयाच्या सभागृहात अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करण्यात आला.यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रीमती.ज्योती पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी पुंडलिक गोडसे,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीमती.पाटील यावेळी म्हणाल्या की, मुस्लिम,बौद्ध,शीख,ख्रिश्चन,जैन व पारशी हा समाज अल्पसंख्यांक समुदायात येतो. त्यांच्यासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली पाहिजे.योजनांच्या लाभातून त्यांच्या विकासाला गती मिळण्यास मदत होईल. विविध यंत्रणांनी शासनाच्या ज्या योजना आहेत,त्यांच्यापर्यंत त्या प्रभावीपणे पोहोचविल्या पाहिजे.यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे.असे त्या म्हणाल्या.

श्री.गोडसे यांनी सांगितले की, अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा अल्पसंख्यांक कल्याण समिती गठीत केली आहे.अल्पसंख्यांक संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपद्धती विहित केली आहे.निवासी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतो. डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना,धार्मिक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल अनुदानित शाळांमध्ये पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी अनुदान योजना व अल्पसंख्यांक बहुल नागरी व ग्रामीण वस्तीत मूलभूत सुविधा अशा प्रकारच्या योजना राबवण्यात येत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

श्री.खडसे यांनी अल्पसंख्यांकांच्या अन्य योजनांची माहिती देखील यावेळी उपस्थित अल्पसंख्याक समुदायातील नागरिकांना दिली.यावेळी अल्पसंख्यांक प्रतिनिधी जुल्फीकार काझी यांनी अल्पसंख्यांक समाजासाठी विविध योजना आहेत.त्याची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे. भारतीय राज्यघटनेत अल्पसंख्यांकांचे विकासासाठी विविध कलमे तयार केली आहेत. अल्पसंख्यांकांचा प्रश्न देशापुरताच मर्यादित नाही तर वैश्विक आहे.हा समाज शिक्षणात पुढे जाणार नाही तर विकसित होणार नाही.संविधानांनी दिलेल्या अधिकाराची प्रभावी अंमलबजावणी केली जावी. अल्पसंख्यांकासाठी स्वतंत्र कार्यालय व पुरेसा अधिकारी कर्मचारी वर्ग असावा. अल्पसंख्यांक समाजासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतूदीनुसार निधी राखीव ठेवावा. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना ७ हजार रुपये शिष्यवृत्ती द्यावी असे ते म्हणाले.

यावेळी समाज भूषण शंकर खुणे म्हणाले की,अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी प्रत्येकाने काम केले पाहिजे. भारतीय संविधानानुसार प्रत्येकाने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडून समाजाच्या विकासासाठी हातभार लावावा. अल्पसंख्यांक समाजातील विविध घटकांच्या विकासाच्या दृष्टीने काम केले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

श्री.सय्यद खलील म्हणाले की,योजना राबवितांना अधिकाऱ्यांनी मानसिकता बदलली पाहिजे.योजनांच्या अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण झाले पाहिजे.मदरसा आधुनिकीकरण योजनेत सुलभता आली पाहिजे.अल्पसंख्यांक योजना राबविताना प्रामाणिकपणा असला पाहिजे. अल्पसंख्यांक वस्त्यांमध्ये सोयी सुविधा निर्माण केल्या पाहिजे.त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी यंत्रणांनी त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहिजे.समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण व विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जावी असे ते म्हणाले.यावेळी अतुल अजमेरा यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले

या कार्यक्रमाला सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी विष्णू ठोंबरे व चंद्रकांत भगत, समाजभूषण पुरस्कार प्राप्त शंकर खुणे, अल्पसंख्यांक अधिकारी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष शेख खुद्बुद्दीन हुसेन,अतुल अजमेरा,खलील सैफ सय्यद, जुल्फीकार काझी, ॲड. अश्विनी सोनटक्के, ऍड. मायादेवी सरवदे, काझी नसिरुद्दीन शेख,शेख नसरुद्दीन इसाकउद्दीन, ॲड. ज्योती बेडकर,अँड.प्रियंका साबळे, विनीत तेलोरे,शेख नसरुद्दीन, मोहम्मद अझरुद्दीन काझी,ॲड.विद्युलता, इकबाल पटेल, पटेल सिकंदर निजाम साहेब,एजाज बागवान,सुधाकर माळाळे सलीम मणियार, सिद्दिकी मोजुद्दीन यांची उपस्थिती होती.

उपस्थितांचे आभार जिल्हा नियोजन अधिकारी विष्णू ठोंबरे यांनी मानले.

## मतमोजणी परिसरात कलम १६३ लागू

धाराशिव, (जिमाका)- स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक-२०२५ अंतर्गत दि. २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीच्या कालावधीत मतमोजणी परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम १६३ लागू करण्यात येत आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव,तुळजापूर, नळदुर्ग, उमरगा, मुरुम, कळंब, भूम व परंडा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची मतमोजणी दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे.

जिल्ह्यातील वरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय वातावरणात पार पडावी तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, या दृष्टीकोनातून मतमोजणीच्या ठिकाणी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता,२०२३ चे कलम १६३ जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पूजार यांनी आपल्या अधिकारांचा वापर करून खालीलप्रमाणे कृत्य करण्यास मनाई केली आहे.

मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्ष कार्यालये,मंडप,सर्व दुकाने तसेच मोबाईल फोन, पेजर, वॉकी-टॉकी, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या वापरावर बंदी घालण्यात येत आहे. निवडणूक मतमोजणीच्या कामाव्यतिरिक्त इतर खाजगी वाहनांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात नियुक्त अधिकारी व कर्मचारी वगळता पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

मतमोजणी परिसरात मतमोजणी कामकाजाव्यतिरिक्त ध्वनीक्षेपक वापरणे,वाद्य वाजविणे तसेच मिरवणुका काढण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.निवडणूक मतमोजणी कामासाठी नियुक्त असलेल्या अधिकारी कर्मचारी व्यतिरिक्त इतर व्यक्तींना वैध ओळखपत्र असल्याशिवाय प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

हा आदेश मतमोजणीच्या कामासाठी नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी लागू राहणार नाही.जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर,नळदुर्ग,उमरगा,मुरूम,कळंब, भूम व परांडा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतमोजणीची कामे हाताळताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये या दृष्टिकोनातून २१ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणीच्या दिवशी सकाळी ६ वाजतापासून ते मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत हा आदेश अंमलात राहणार आहे.

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचा विद्यार्थी स्वप्नील ताकमोगे याची भारतीय सैन्य दलात निवड



धाराशिव (प्रतिनिधी)- रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या बारावी वाणिज्य शाखेचा विद्यार्थी स्वप्नील ताकमोगे याची नुकतीच भारतीय सैन्य दलात निवड झाली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जिद्द व चिकाटीच्या जोरावर सदर विद्यार्थ्याने बारावी वर्गात शिकत असतानाच सैन्य दलात भरती होण्याचे स्वप्न पूर्ण केले आहे. रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाने आजपर्यंत अनेक शैक्षणिक पिढ्यांच्या भवितव्याला प्रामाणिक आकार दिला आहे. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांनी प्रेरित झालेले असंख्य विद्यार्थी घडवण्याचं काम रामकृष्ण परमहंस महाविद्यालय अविरतपणे करत आहे. शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असताना सुद्धा सातत्यपूर्ण प्रयत्न, प्रामाणिकता याच्या बळावर सदर विद्यार्थ्यांनी हे यश संपादित केले आहे. त्याच्या यशाबद्दल रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या शुभहस्ते या विद्यार्थ्याचा सत्कार करण्यात आला यावेळी ज्युनियर वाणिज्य विभागाचे प्रमुख डॉ. अभय देशमाने व इतर गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाडीबीटीवरील अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज ३१ डिसेंबरपर्यंत निकाली काढण्याचे आवाहन

धाराशिव दि.१८ डिसेंबर (जिमाका) शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीतील विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावरील प्रलंबित अर्ज निकाली काढण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ डिसेंबर २०२५ ही निश्चित करण्यात आली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता आदी शिष्यवृत्तींचा लाभ महाडीबीटी (चरहरऊइढ) ऑनलाईन प्रणालीद्वारे अदा करण्यात येतो.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीतील महाडीबीटी प्रणालीवरील अनुसूचित जाती प्रवर्गातील अर्ज विद्यार्थी स्तरावर तसेच महाविद्यालय स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याबाबत आयुक्त,समाज कल्याण आयुक्तालय,पुणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.त्यानुसार, सदर कालावधीतील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडीबीटी प्रणालीवरील प्रलंबित अर्ज (विद्यार्थीस्तरावर किंवा महाविद्यालयस्तरावर) पूर्णतः निकाली काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने धाराशिव जिल्ह्यातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीत एकूण २१२४ अर्ज प्रलंबित आहे.या कालावधीत हे अर्ज महाविद्यालय स्तरावरील तसेच विद्यार्थी स्तरावर प्रलंबित आहेत.

तरी शैक्षणिक वर्ष २०१९-२०ते २०२४-२५ या कालावधीतील महाडीबीटी प्रणालीवरील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित असलेले सर्व अर्ज ३१ डिसेंबर २०२५ अखेर पूर्णतः निकाली काढण्यात यावेत. विहीत मुदतीत अर्ज निकाली न काढल्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी,असे आवाहन सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव यांनी केले आहे.

## सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती पुनर्गठित



धाराशिव, (जिमाका)-जिल्ह्यातील माजी सैनिकांच्या कुटुंबियांना संरक्षण देण्यासाठी जिल्हास्तरीय समितीचे पुनर्गठन करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत.या निर्देशानुसार जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून एक माजी सैनिक संरक्षण समितीवर सदस्य म्हणून नेमण्यात येणार आहे.

या अनुषंगाने,प्रत्येक तालुक्यातील इच्छुक एक माजी सैनिक यांनी संरक्षण समितीवर सदस्य म्हणून नेमणूक होण्यासाठी आपले नाव नोंदवावे,असे आवाहन करण्यात आले आहे.यासाठी संबंधित माजी सैनिकांनी डिस्चार्ज बुक,पी.पी.ओ. (झझज) व मोबाईल क्रमांकासह आपली माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे दिनांक २३ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावी.

सैनिकांच्या कुटुंबियांना आवश्यक संरक्षण व मदत अधिक प्रभावीपणे मिळावी,या उद्देशाने ही जिल्हास्तरीय समिती पुनर्गठित करण्यात येत असून,माजी सैनिकांचा प्रत्यक्ष सहभाग यामुळे समितीचे कामकाज अधिक सक्षम होणार आहे.

ही माहिती लेफ्टनंट कर्नल शरद प्रकाश पांढरे (नि.),जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी दिली असून,पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी दिलेल्या मुदतीत आपली नोंदणी करावी,असे त्यांनी आवाहन केले आहे.

## घरी एकटी असताना तरुणाने लैंगीक अत्याचार केला: पोलिसात गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलीसाकडून समजलेली माहिती अशी की, एका गावातील १४ वर्षीय मुलगी दि.१५.१२.२०२५ रोजी १४.०० ते दि. १५.१२.२०२५ रोजी हि घरी एकटी असताना गावातील एका तरुणाने तिचे घरी येवून तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. नमुद मुलगी व तिचे नातेवाईक हे नमुद तुरुणास विचारणा करीत असताना नमुद तरूणाने जातीवाचक शिवीगाळ करुन नमुद मुलीचे भावास शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. व इतर तीन तरुणांनी नमुद मुलीचे भावास शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी लोखंडी रॉड, काठी व दगडाने मारहाण जखमी करुन धमकी दिली. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.१७.१२.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४, ६५, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५ सह ४, ६ पोक्सो क्ट सह अ.जा.ज.अ.प्र. कलम ३(१)(डब्ल्यु)(ळ)(ळळ), ३(२)(ीं), ३(१)(आर)(एस) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

**NOTICE**

**15th Bn INDO TIBETAN BORDER POLICE FORCE(MHA), POST OFFICE-GARHI, DISTT-UDHAMPUR(J&K)**

Regt no. 210040542 Constable (General Duty) Gophane Someshwar Bibhisan S/o Sh. Bibhisan, Village-Pimparkhed, P.O.-Paranda, Tehsil-Paranda, District-Osmanabad (Maharashtra) is hereby informed through this notice that You are absenting from sanctioned leave without any information and prior permission of the competent authority w.e.f. 18.08.25(FN). To enquire into the circumstances under which you are absenting yourself, a Court of Inquiry board was constituted and as per the opinion of Court of Inquiry Board, you have been declared Deserter w.e.f. 25.07.25(AN) vide this office Order No. 5927-99 dtd. 18.10.2025. You are again being informed through this notice to report at 15BN, Indo Tibetan Border Police Force, Paranoo Camp, P.O.-Garhi, Distt-Udhampur (J & K) within 30 days after publication of this notice. If you fails to report on duty, it will be assumed that you are not willing to serve in the Force and your services will be terminated as per the provisions laid down in Indo Tibetan Border Police Force Act 1992 and Indo Tibetan Border Police Force Rule 1994.

Sd./-
Commandant
15th Bn, ITB Police

CBC 19112/11/0217/2526

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भारतीय जवान हे पराक्रमीच आहेत

भारतीय सैन्याच्या कामगिरीमुळे देशातील जनता शांत झोपते. निश्चिंत राहाते. सैन्य दलाने केलेली कारवाईवर काही दिवसानंतर मत व्यक्त करणे चुकीचे आहे. ऑपरेशन सिंदुर यशस्वी झाले हे जगाला माहिती. कॅप्टन महिलाने केलेली कारवाई जगाने पाहिली आहे असे असताना काही तरी गैरसमज निर्माण करणारे विचार, हे विचारवंतानी करणे अयोग्य आहे. भारतीय सैन्यदल तिन्हीही प्रभावशाली आहेत. भारताचे दिवंगत 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' म्हणजे तिन्ही संरक्षण दलांचे प्रमुख जनरल बिपीन रावत सातत्याने म्हणत असत की, भारताला एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढावे लागू शकते. त्या वेळी आपण चीनशी दोन हात करण्याची मानसिकता निर्माण करत होतो आणि गलवानच्या वेळी त्याचा परिणाम दिसूनही आला. आपण चीनला पाणी पाजू शकतो, हे गलवान येथील घटनेतून सिद्ध झाले. पाकिस्तानला आपण आतापर्यंतच्या प्रत्येक युद्धात पाणी पाजलेच आहे; मात्र जर हे दोन्ही एकत्र आले आणि त्यांनी भारताशी दोन हात केले, तर काय ? या दृष्टीने भारत स्वतः ला सिद्ध करत आहेच. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने अवघ्या ८८ घंट्यांत पाकचे कंबरडे मोडले, हे जगाने पाहिले. एकही भारतीय सैनिक सीमा पार करून पाकमध्ये गेला नाही आणि भारताने ही कमाल केली. यामुळे पाकिस्तानने लोटांगण घालत युद्ध थांबवण्याची याचना केल्यावर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'ला तात्पुरती स्थगिती दिली. या घटनेपासून आतापर्यंत भारतीय सैन्यदलप्रमुख, अन्य वरिष्ठ सैन्याधिकारी, संरक्षणमंत्री सातत्याने भारत युद्धसज्ज असून काहीतरी मोठे करण्याच्या प्रयत्नात आहे, अशाच अर्थाची विधाने करत आहेत. कालपर्यंत पाकव्याप्त काश्मीरविषयी बोलणारा भारत सिंधुदेशाविषयीही बोलू लागल्यावर केवळ भारतियांचेच नाही, तर जगाचे लक्ष भारताकडे लागले आहे. भारतियांनाही 'भारत सरकार काय करण्याच्या विचारात आहे?', असा प्रश्न आणि जिज्ञासा निर्माण झाली आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी 'पाकव्याप्त काश्मीर आता भारतात आलाच', अशी स्थिती निर्माण झाल्याचे भारतियांनी पाहिले होते; मात्र भारताने युद्धाला स्थगिती दिली आणि पाकव्याप्त काश्मीर परत आणण्याचे स्वप्न पूर्ण होण्यापासून राहिले. 'हे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याच्या सिद्धतेत भारत आहे का ?' असा प्रश्न एकूण विधानांवरून उमटत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशामुळे भारतीय सैन्य, सरकार आणि भारतीय नागरिक यांचा आत्मविश्वास प्रचंड वाढला आहे. 'भारत असा पराक्रम करून पाकला नष्ट करण्यासह चीनलाही धडा शिकवू शकतो', असा विश्वास निर्माण झाला आहे. यामुळेच सैन्याधिकारी सातत्याने 'ऑपरेशन सिंदूर'चे कौतुक सांगत 'भविष्यात भारत काय करू शकतो', याचा गर्भित संदेशही देत आहेत. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी थेट सिंधुदेशाचा उल्लेख केल्यावर हा आत्मविश्वास कोणत्या स्थितीपर्यंत निर्माण झाला आहे, हे लक्षात येते. असे जरी असले, तरी 'प्रत्यक्षात युद्ध चालू झाले, तर पाक आणि कदाचित् चीन यांचे प्रत्युत्तर कसे असेल आणि त्याच वेळी आंतरराष्ट्रीय स्तरावर काय प्रतिक्रिया उमटतील? कोण कुणाला साहाय्य करील किंवा कोण युद्ध थांबवण्यासाठी दोन्ही देशांवर दबाव टाकील? ऑपरेशन सिंदूरच्या वेळी ट्रम्प यांनी ते थांबवण्यास भाग पाडल्याचे ट्रम्प स्वत-ःच अनेकदा सांगत आहेत. तसे झाले, तर भारताला अपेक्षित लक्ष्य साध्य करता येईल का?', असे प्रश्न उपस्थितीत होतात. 'भारताने या सर्व स्थितीचा अभ्यास केला असणार आणि म्हणूनच विधाने केली जात आहेत', असा विचार येतो. पाकिस्तान स्वतः आर्थिक, राजकीय आणि सामाजिक विघटन यांच्या काठावर उभा आहे. महागाई, आतंकवाद, प्रांतिक स्वायत्ततेचे प्रश्न, विशेषतः गिलगिट-बाल्टिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर येथील आंदोलने, हे सर्व पाकिस्तानातील सरकारचे नियंत्रण ढासळत असल्याचे द्योतक आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारताविषयी सकारात्मकता वाढल्याची चिन्हे दिसत आहेत. लोकांना भारतातील विकास, रस्ते, आरोग्य, रोजगार यांचे चित्र दिसत आहे आणि त्यामुळे मानसिक सीमा हळूहळू पालटत आहेत. इम्रान खान यांच्या प्रकरणात पाकमध्ये असंतोष आहे. बलुचिस्तान आणि खैबर पख्तूनख्वामध्ये सैन्यावर आक्रमणे होत आहेत. आताच भारताने पाकवर आक्रमण केले, तर पाक ते सहन करू शकणार नाही, हेच वास्तव आहे; कारण 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी पाकची स्थिती आताच्या तुलनेत काही प्रमाणात चांगली होती. तरीही तो लढण्यास उभा राहू शकला नाही. आतातर स्थिती आणखी बिघडली आहे. दुसरीकडे चीन पाकसाठी सध्या प्रत्यक्षात युद्धभूमीवर उतरेल आणि साहाय्य करील, अशी स्थिती वाटत नाही. पाक सध्या अमेरिकेच्या मांडीवर जाऊन बसल्याने चीन अप्रसन्न आहे. त्यातच गेल्या काही वर्षांपासून त्याचा पाकमधील 'पाक-चीन आर्थिक महामार्ग' प्रकल्प ठप्प पडल्यातच जमा आहे. चीनच्या कर्मचाऱ्यावर सातत्याने आक्रमणे होत असून पाक त्यांचे रक्षण करण्यास असमर्थ ठरला आहे. यामुळे चीन प्रत्यक्षात पुढे येणार नाही. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी ज्याप्रमाणे त्याने तांत्रिक साहाय्य केले, शस्त्रपुरवठा केला, तसा तो करू शकतो. असा विचार केला, तर भारताचे सैन्याधिकारी दीर्घकालीन युद्धासाठी सज्ज रहाण्याचे आवाहन का करत आहेत? असा प्रश्न उपस्थित होतो. सैन्याकडे काही वेगळी माहिती असू शकते. दीर्घकालीन म्हणजे 'गेल्या ३ वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्ध चालू आहे, तसे युद्ध होऊ शकते का?', असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. पाकची क्षमता पहाता, असे होण्याची शक्यता नाहीच. भारताने बांगलादेशाच्या निर्मितीच्या युद्धाच्या वेळी अवघ्या १३ दिवसांत पाकला पराजित केले होते. केवळ कारगिलचे युद्धच १ महिना चालले; कारण त्या वेळी वायूदलाचा वापर केला गेला नाही. तो शेवटी केला गेला आणि भारत विजयी झाला. तरीं भारताने दीर्घकालीन युद्धासाठी सज्ज राहिलेच पाहिजे. सीमेवर सैनिक आहेत; भारतात धर्मांध मंडळीचा देशद्रोह्यांची वानवा नाही, त्यांच्याशी दोन हात करण्याची स्थिती निर्माण होऊ शकते आणि ती कदाचित् दीर्घकालीन ठरेल. काही झाले तरी भारतीय जवान हे धाडसी आहे. पराक्रमी आहेत हे विसरता येत नाही.

# संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य



भारतीय समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित न राहता पुढील पिढ्यांना दिशा देणारे ठरते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, दारिद्र्य आणि विषमता यांविरुद्ध आपल्या आचरणातून बंड पुकारणारे आणि उपदेशापेक्षा कृतीला अधिक महत्त्व देणारे थोर संत म्हणजे संत गाडगे महाराज होय. २० डिसेंबर रोजी असणाऱ्या त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा मागोवा घेताना असे लक्षात येते की गाडगे महाराज हे केवळ कीर्तनकार किंवा संत नव्हते, तर ते एका व्यापक अर्थाने समाजसुधारक, लोकशिक्षक आणि परिवर्तनवादी विचारवंत होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत माणुसकी, स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक समतेचा संदेश पोहोचवण्यासाठी केला.

गाडगे महाराजांचा जन्म एका अत्यंत साध्या, गरीब कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी दारिद्र्य, उपेक्षा आणि सामाजिक विषमतेचे वास्तव जवळून अनुभवले. या अनुभवांनी त्यांच्या मनात समाजाबद्दल करुणा आणि अस्वस्थता निर्माण केली. समाजातील दुःख, अज्ञान आणि अस्वच्छता ही केवळ दैवाची देणगी नसून मानवी निष्काळजीपणा, अज्ञान आणि शोषणाची परिणती आहे, ही जाणीव त्यांना लवकरच झाली. म्हणूनच त्यांनी देव, धर्म आणि अध्यात्म याकडे पाहण्याची पारंपरिक चौकट नाकारून माणूस, समाज आणि नैतिक कर्तव्य यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या मते, देवाची खरी पूजा म्हणजे माणसाची सेवा आणि समाजहिताचे कार्य होय.

संत गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या स्वच्छतेच्या विचारात दिसून येतो. स्वच्छता हा केवळ आरोग्याचा विषय नसून तो सामाजिक शिस्तीचा, आत्मसन्मानाचा आणि सभ्यतेचा निर्देशक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. गावोगावी कीर्तनासाठी जात असताना ते सर्वप्रथम हातात झाडू घेऊन रस्ते, चौक, धर्मशाळा आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करत. ही कृती केवळ साफसफाईपुरती मर्यादित नव्हती, तर ती समाजाला दिलेला मौनातील संदेश होता. 'स्वच्छता म्हणजे धर्म' हा विचार त्यांनी शब्दांत नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून रुजवला. लोकांना उपदेश करण्यापेक्षा त्यांनी स्वतः झाडू हातात घेतल्याने समाजमनावर त्याचा खोल परिणाम झाला. स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजाला त्यांनी आरसा दाखवला.

त्यांच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन. तत्कालीन समाजात देव-धर्माच्या नावाखाली अनेक गैरप्रथा, कर्मकांड आणि अंधश्रद्धा प्रचलित होत्या. गाडगे महाराजांनी यांना थेट आव्हान दिले. देवळात घंटा वाजवून, नारळ फोडून किंवा महागड्या पूजा करून समाजाचे भले होत नाही, तर शिक्षण, स्वच्छता, आरोग्य आणि मानवसेवा यातूनच समाज उन्नत होतो, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केला. त्यांच्या भाषेत साधेपणा होता, पण आशयात प्रखर सामाजिक जाण होती. त्यामुळे त्यांच्या शब्दांचा प्रभाव ग्रामीण समाजावर विशेषतः मोठ्या प्रमाणात पडला.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, याची जाणीव गाडगे महाराजांना होती. शिक्षणाविना समाज अज्ञानाच्या अंधारात राहतो आणि शोषणाला बळी पडतो, हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी शिक्षणासाठी निधी उभारण्याचे कार्य सुरू केले. कीर्तनातून मिळालेला पैसा त्यांनी स्वतःसाठी कधीही वापरला नाही. हा पैसा त्यांनी शाळा, वसतिगृहे, धर्मशाळा आणि समाजोपयोगी संस्थांसाठी दिला. विशेषतः गरीब, दलित आणि वंचित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नव्हे, तर माणूस म्हणून जगण्याची कला आहे, असा त्यांचा विश्वास होता.

गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्यात जातिभेद आणि अस्पृश्यतेविरोधातील लढा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्या काळातील समाज कठोर जातीय विभागणीने ग्रासलेला होता. अस्पृश्यतेमुळे समाजातील मोठा वर्ग मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित होता. गाडगे महाराजांनी या अन्यायाविरुद्ध निर्भीड भूमिका घेतली. त्यांनी आपल्या कीर्तनांतून आणि कृतीतून जातिभेदाचा निषेध केला. सर्व माणसे समान आहेत आणि त्यांचा सन्मान करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या आश्रमांमध्ये आणि धर्मशाळांमध्ये जातपात न पाहता सर्वांना समान वागणूक दिली जात असे. ही कृती त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला थेट आव्हान देणारी होती.

दारिद्र्य निर्मूलन आणि गरिबांची सेवा हा गाडगे महाराजांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू होता. गरिबी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक आणि मानसिक गुलामगिरी निर्माण करते, असे त्यांचे मत होते. त्यामुळे गरिबांना मदत करताना केवळ दानधर्म न करता त्यांना स्वावलंबी बनवण्यावर त्यांनी भर दिला. भुकेल्याला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि संकटात सापडलेल्या माणसाला आधार देणे, हे त्यांना धार्मिक कृत्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्या जीवनशैलीतून त्यांनी साधेपणा आणि त्यागाचे उदाहरण घालून दिले.

गाडगे महाराजांचे कीर्तन हे केवळ धार्मिक प्रवचन नव्हते, तर ते एक सामाजिक व्यासपीठ होते. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी समाजातील प्रश्न मांडले, अन्यायावर टीका केली आणि परिवर्तनाची गरज अधोरेखित केली. त्यांच्या भाषेत ग्रामीण बोलीचा सहजपणा होता, त्यामुळे सामान्य माणसाला ते आपलेसे वाटत. त्यांनी कधीही अवघड तात्त्विक संकल्पना मांडल्या नाहीत, पण साध्या उदाहरणांतून त्यांनी खोल सामाजिक सत्ये उलगडली. त्यामुळे त्यांच्या कीर्तनांना मोठ्या प्रमाणावर लोक उपस्थित राहत आणि त्यांच्या विचारांचा प्रसार होत असे.

स्त्री-सन्मान आणि स्त्रियांच्या स्थितीबाबतही गाडगे महाराजांची भूमिका प्रगत होती. त्या काळात स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सामाजिक सन्मान नाकारला जात होता. गाडगे महाराजांनी स्त्रियांकडे केवळ करुणेने नव्हे, तर समानतेच्या दृष्टीने पाहिले. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ती आहे आणि तिच्या उन्नतीशिवाय समाजाचा विकास शक्य नाही, असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी स्त्रीशिक्षणाला पाठिंबा दिला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला.

संत गाडगे महाराजांच्या कार्यात धर्माची व्याख्या अत्यंत मानवी स्वरूपाची होती. त्यांच्या मते, धर्म म्हणजे मंदिर, मशीद किंवा चर्चपुरता मर्यादित नसून तो माणसाच्या आचरणात दिसून यायला हवा. स्वच्छता, प्रामाणिकपणा, करुणा, समानता आणि सेवाभाव हेच खरे धार्मिक मूल्ये आहेत. त्यांनी कर्मकांड, दिखावा आणि अंधश्रद्धेच्या नावाखाली चालणाऱ्या शोषणाचा तीव्र निषेध केला. त्यामुळे काही वेळा त्यांना विरोधालाही सामोरे जावे लागले, पण त्यांनी कधीही आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.

गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा प्रभाव त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही. त्यांच्या विचारांनी पुढील अनेक समाजसुधारक, कार्यकर्ते आणि चळवळींना प्रेरणा दिली. स्वच्छतेचा संदेश, शिक्षणाचे महत्त्व, अंधश्रद्धेविरोधी भूमिका आणि सामाजिक समतेचा आग्रह हे सर्व विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. आजच्या काळातही समाज अस्वच्छता, अंधश्रद्धा, विषमता आणि नैतिक अधःपतन अशा समस्यांनी ग्रासलेला आहे. अशा परिस्थितीत गाडगे महाराजांचे विचार अधिकच समर्पक वाटतात.

समकालीन समाजात गाडगे महाराजांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. स्वच्छ भारत अभियान, सामाजिक समता, शिक्षण सर्वांसाठी आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या उपक्रमांना गाडगे महाराजांच्या विचारांची वैचारिक बैठक लाभू शकते. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे केवळ सरकारी योजना किंवा कायदे नव्हेत, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या आचरणातून समाजहित साधण्याचा मार्ग आहे. हातात झाडू घेऊन स्वच्छता करणे, गरजूला मदत करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि अंधश्रद्धेला प्रश्न विचारणे हीच गाडगे महाराजांना खरी श्रद्धांजली ठरू शकते.

संत गाडगे महाराजांच्या जीवनाकडे पाहिले तर असे लक्षात येते की त्यांनी कधीही प्रसिद्धी, सत्ता किंवा संपत्तीचा पाठलाग केला नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य सेवाभाव, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होते. त्यांनी समाजाला उपदेश केला नाही, तर स्वतः उदाहरण घालून दिले. म्हणूनच ते केवळ संत नव्हते, तर ते एक जिवंत सामाजिक चळवळ होते. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा स्मरण करताना आपल्यालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, आपण समाजासाठी काय करत आहोत, हा प्रश्न स्वतःला विचारण्याची हीच योग्य वेळ आहे.

अशा या थोर समाजसुधारकाच्या स्मृतीला वंदन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की संत गाडगे महाराजांचे विचार हे काळाच्या पुढे जाणारे होते. त्यांनी दाखवलेला मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा मार्ग आजही तितकाच प्रकाशमान आहे. समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेतली, तर खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडू शकेल. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ भूतकाळाची उजळणी नव्हे, तर वर्तमान आणि भविष्य घडवण्याची प्रेरणा घेणे होय.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# कॅल्शिअमचा मोठा स्रोत आहेत 'या' ४ डाळी, नियमित सेवनाने हाडे होतात मजबूत



भारतीय लोकांच्या आहारात डाळ हा महत्वाचा भाग आहे. दररोज डाळ खाल्ल्याशिवाय जेवण पूर्ण होत नाही. बहुतांश लोक दिवसातून दोनदा न चुकता डाळींचे सेवन करतच असतात. डाळी हा प्रोटीनचा एक उत्तम स्रोत आहे. हे सर्वांनाच महियी आहे. परंतु फारच कमी लोकांना माहिती असेल की, डाळी हा कॅल्शिअम, पोटॅशिअम, मॅग्नेशिअम, लोह, फायबर आणि व्हिटॅमिन्सचासुद्धा चांगला स्रोत आहे.

डाळींचे सेवन केल्याने शरीरातील अशक्तपणा दूर होऊन हाडांना बळकटी मिळते, लोहाची कमतरता दूर होऊन हिमोग्लोबिन वाढण्यास मदत होते. तसेच पचनाच्या समस्या दूर होतात. त्याचप्रमाणे कॅल्शिअम वाढून हाडे मजबूत होतात आणि सांध्यांचे दुखणे कमी होते. सर्वच डाळी फायदेशीर असतात. परंतु काही डाळी जास्त उपयुक्त आणि पौष्टिक असतात. आज आपण अशाच काही डाळींबाबत जाणून घेऊया जे कॅल्शिअम वाढवण्यास मदत करतात..

मसूर डाळ-

मसूरची डाळ पोषक तत्वांनी समृद्ध असते. तसेच ती पचायलाही हलकी असते. त्यामध्ये फॅट कमी आणि प्रोटीन भरपूर प्रमाणात असते. १०० ग्रॅम मसूर डाळीत जवळपास २४ ग्रॅम प्रोटीन असते. तसेच मसूरच्या डाळीत कॅल्शिअमचे प्रमाणसुद्धा चांगले असते. त्याच्या सेवनाने हाडे मजबूत होतात. आणि सांध्याच्या समस्या दूर होतात.

मूग डाळ-

मूग डाळीतसुद्धा अनेक पोषक तत्वे असतात. मूग डाळ सर्वात सात्विक आणि पौष्टिक समजली जाते. त्यामध्ये असलेले आयरन, पोटॅशिअम, कॅल्शिअम आणि प्रोटीन शरीरासाठी आवश्यक असतात. मूग डाळीने कॅल्शिअम तर वाढतेच शिवाय बद्धकोष्ठता, पचनाच्या इतर समस्या दूर होतात.

उडीद डाळ-

उडिदाची डाळ कॅल्शिअमने समृद्ध असते.त्यामुळेच ती हाडे आणि सांध्यांसाठी अतिशय फायदेशीर समजली जाते. त्यातील लोहामुळे शरीरातील रक्ताची कमतरता दूर होऊन ताकद मिळते. आयुर्वेदात उडीद डाळीला बलवर्धक आहार समजले जाते.

कुळीथ डाळ-

कुळथाची डाळसुद्धा अतिशय पौष्टिक असते. कुळथाच्या डाळीत कॅल्शिअम, आयरन, प्रोटीन आणि पोटॅशिअमसारखे विविध गुणधर्म असतात. त्याच्या सेवनाने हाडांमध्ये ताकत येते. विविध समस्या दूर होतात.

# नोकरीसाठी वापरून पहा हे एआय टूल्स; रेझ्युमे, कव्हर लेटर आणि मुलाखत प्रत्येक गोष्टीत होईल मदत




सध्याच्या काळात नोकरीच्या बाजारपेठेत स्पर्धा खूप कठीण आहे, त्यामुळे नोकरी शोधणे सोपे नाही. प्रत्येक कंपनीला सर्वोत्तम उमेदवार हवा असतो. अशा परिस्थितीत तुमची तयारी खूप महत्त्वाची भूमिका बजावते. रेझ्युमे आणि कव्हर लेटर लिहिण्यापासून ते मुलाखत देण्यापर्यंत, प्रत्येक टप्प्यावर तुम्हाला चांगली कामगिरी करणे आवश्यक आहे. जर तुम्हाला चांगल्या ठिकाणी नोकरी हवी असेल, तर या गोष्टी कराव्या लागतील आणि तंत्रज्ञान तुम्हाला यामध्ये मदत करू शकते. तुम्ही आर्टिफिशियल इंटेलिजन्स टूल्स वापरून तुमची उमेदवारी मजबूत करू शकता.

अख टूल्स तुम्हाला रेझ्युमे तयार करण्यात मदत करतात. याशिवाय कव्हर लेटर लिहिणे आणि मुलाखतीची तयारी करणे यासाठीही त्याचा उपयोग होतो. या एआय टूल्सचा वापर करून तुम्ही तुमची उमेदवारी सहज मजबूत करू शकता. चला काही सर्वोत्तम अख साधनांवर एक नजर टाकूया जी तुम्हाला तुमच्या स्वप्नातील नोकरी मिळवण्यात मदत करू शकतात.

तुमचा वेळ आणि मेहनत वाचवण्यासाठी तुम्ही अख सह रेझ्युमे तयार करू शकता. बाजारात अनेक एआय रेझ्युमे बिल्डर ॲप्स आणि टूल्स उपलब्ध आहेत. काही सर्वोत्कृष्ट अख रेझ्युमे निर्मात्यांबद्दल बोलताना, तुम्ही छौंर्शीीश, एपहरपर्लीं, घळलज्ञीर्शीीश, ठर्शीीरज्ञशी अख आणि ढशरश्रक्ट वापरू शकता. हे तुम्हाला चांगला रेझ्युमे बनवण्यात मदत करतील.

कव्हर लेटर हा नोकरीच्या अर्जाचा महत्त्वाचा भाग आहे. तुमची ही बाजू मजबूत ठेवण्यासाठी तुम्ही अख ची मदत घेऊ शकता. उहर्रींत्र्झढ आणि उद्दुत ऋशाळपळ अख सारखी अख टूल्स तुमच्यासाठी उत्तम कव्हर लेटर लिहू शकतात. तथापि, एआयने तयार केलेले कव्हर लेटर तपासा आणि आवश्यक असल्यास बदल करा.

इंटरव्ह्यूचे नाव ऐकून अनेकजण घाबरतात. तुम्ही कितीही वेळा मुलाखत दिली असली तरी प्रत्येक मुलाखत आव्हानात्म क असते. मुलाखतीदरम्यान चिंताग्रस्त राहणे कठीण होऊ शकते. पण एआयच्या मदतीने तुम्ही मुलाखतीसाठी चांगला सराव करू शकता. चॅटजीपीटी व्हॉइस हे एक एआय साधन आहे, जे तुम्हाला वास्तविक आवाजांसह मुलाखतीचा सराव करू देते.

**तुमच्या या ५ चुकांमुळे गरम होतो तुमचा स्मार्टफोन, या पद्धतींनी करा थंड**

आजकाल स्मार्टफोन हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. आपण तो प्रत्येक गोष्टीसाठी वापरतो, मग ते बोलणे असो, गेम खेळणे असो किंवा इंटरनेट क्सेस करणे असो. पण काही वेळा फोनच्या अतिवापरामुळे किंवा चुकीच्या वापरामुळे फोन गरम होऊ लागतो. अनेक वेळा जाणूनबुजून किंवा नकळत आपण काही चूक करतो, ज्यामुळे फोन जास्त गरम होतो. यामुळे फोनचा स्फोट होण्याचा धोकाही निर्माण होतो.

तुमचा फोन महाग असो वा स्वस्त, स्मार्टफोनचा चुकीचा वापर केल्याने अतिउष्णतेला आमंत्रण मिळू शकते. या सम स्येपासून मुक्ती मिळवायची असेल, तर काही सवयी बदलाव्या लागतील. चला त्या पाच सवयींबद्दल बोलूया ज्या तुमचा फोन गरम करतात.

**या पाच कारणांमुळे फोन गरम होऊ शकतो-**

**अतिवापर:** जर तुम्ही गेम खेळत असाल, व्हिडिओ पाहत असाल किंवा अनेक तास सतत हेवी ॲप्स वापरत असाल तर फोनचा प्रोसेसर जास्त काम करतो आणि फोन गरम होऊ लागतो.

**चार्जिंग दरम्यान वापरा:** बरेच लोक चार्जिंग करतानाही फोन वापरत राहतात, ज्यामुळे फोनच्या बॅटरीवर जास्त दबाव येतो आणि फोन गरम होतो.

**फोन थेट सूर्यप्रकाशात ठेवणे:** जर तुम्ही फोन थेट सूर्यप्रकाशात ठेवला तर फोनची बॅटरी आणि अंतर्गत घटक गरम होतात.

**खराब कव्हर:** जर तुम्ही फोनवर जाड किंवा रबर कव्हर वापरत असाल तर फोनची उष्णता बाहेर पडू शकत नाही आणि फोन गरम होऊ लागतो.

**व्हायरस किंवा मालवेअर:** काहीवेळा लोक अज्ञात लिंकवर क्लिक करतात, ज्यामुळे व्हायरस आणि मालवेअरचा धोका निर्माण होतो. या धोकादायक व्हायरस आणि म ालवेअरमुळे फोन गरम होऊ शकतो.

**तुमचा फोन थंड करण्याचे मार्ग**

**फोन बंद करा:** जर तुमचा फोन खूप गरम होत असेल, तर आधी तो बंद करा. यामुळे फोनचा प्रोसेसर थंड होईल आणि फोनच्या बॅटरीवरही कमी दाब पडेल.

**कव्हर काढा:** जर तुम्ही फोनवर कव्हर ठेवला आणि फोन गरम होत असेल, तर ते काढून टाका. यामुळे फोनची उष्णता सहज बाहेर पडू शकेल.

**थंड ठिकाणी ठेवा:** फोन गरम होत असल्यास, तो थंड ठिकाणी ठेवा, जसे की पंख्यासमोर किंवा वातानुकूलित खोलीत. रेफ्रिजरेटरमध्ये ठेवण्याची चूक करू नका.

**चार्जिंग थांबवा:** फोन चार्जिंगमधून काढून टाका आणि तो थंड होईपर्यंत चार्ज करू नका.

अनावश्यक ॲप्स बंद करा: तुम्ही वापरत नसलेले ॲप्स बंद करा किंवा अनइंस्टॉल करा. यामुळे फोनचा प्रोसेसर कमी काम करेल आणि फोन जास्त गरम होण्यापासून वाचेल.

व्हायरससाठी स्कॅन करा: जर तुम्हाला वाटत असेल की तुमच्या स्मार्टफोनमध्ये व्हायरस किंवा मालवेअर आहे, तर एखाद्या चांगल्या अँटी-व्हायरस ॲपने फोन स्कॅन करा.



# वातावरणातील विषारी हवा; आरोग्यासाठी घातक



केवळ दिल्लीच नाही, तर मुंबई व पुण्याची हवाही बिघडली आहे. पुण्यात दिवसा 'ए क्यू आय' १७५ पेक्षा जास्त असतो म्हणजे पुण्याची हवा दिवसा 'अनारोग्यकारक' असते. धूर आणि धूळ नागरिकांचा जिवावर बेतत आहे.

राजधानी दिल्लीची हवा आणि वायू प्रदूषण पुन्हा एकदा चर्चेत आहे. तेथे हवेच्या दर्जाचा निर्देशांक (एअर क्वॉलिटी इंडेक्स) गेले काही आठवडे 'वाईट ते धोकादायक ते अति धोकादायक' या पातळीतच राहिला आहे. हा निर्देशांक ४०० ते ७०० या पातळीवर पोचला होता. याचा अर्थ दिल्लीत श्वास घेणेही धोकादायक ठरत आहे.

यामुळे कडक नियम व निर्बंध लागू करणे राज्य सरकारला भाग पडले आहे. हवा घातक बनल्याने नागरिकांनी बाहेर पडू नये यासाठी 'घरून काम करणे' सक्तीचे करण्याची वेळ दिल्ली सरकारवर आली आहे. सरकारी व खासगी क्षेत्रातील सर्व संस्थांच्या कर्मचार्‍यांपैकी किमान ५० टक्के जणांनी घरून काम करावे, असा आदेश दिल्ली सरकारने दिला आहे. सर्व प्रकारचे बांधकाम बंद झाल्याने त्या कामांवरील नोंदणीकृत बेरोजगार झालेल्या मजुरांना प्रत्येकी १० हजार रुपये नुकसान भरपाई दिली जाणार आहे; पण ती एकदाच दिली जाणार आहे. पर्राज्यातील वाहनांवर प्रवेश बंदी, प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळणार्‍या वाहनांनाच इंधन विक्री करण्याचे निर्बंध असे उपायही दिल्ली सरकारने अवलंबले आहेत; पण ते निरुपयोगी ठरत आहेत. अल्पकालीन उपाय योजण्याऐवजी हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आखाव्यात अशी सूचना सर्वोच्च न्यायालयाने केली आहे.

आरोग्य धोक्यात

दिल्लीच्या हवेच्या प्रदूषणाची दखल सर न्यायाधीश सूर्य कांत यांनीही घेतली. गेल्या आठवड्यात त्यांनी याबद्दल वारंवार चिंता व्यक्त केलीच; पण न्यायालयाचे कामकाज 'हायब्रीड' पद्धतीने चालवण्याची सूचनाही वकिलांना आणि पक्षकारांना केली. सर्वच खटल्यांचे कामकाज, सुनावणी वकिलांचे युक्तिवाद 'दूरस्थ' पद्धतीने, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे चालवणे बरेच अवघड आहे. दिल्लीची वायू प्रदूषणाची समस्या जुनी आहे. दरवर्षी हिवाळा सुरु होताना दिल्लीच्या हवेची गुणवत्ता घसरते. शेजारच्या हरयाना राज्यातील शेतकरी दिवाळीनंतर शेतातील तण जाळू लागतात. तो धूर दिल्लीत येतो व प्रदूषण वाढते. त्यावर उपाय म्हणून आधीच्या आम आदमी पक्षाच्या सरकारने रसायने वापरून तण नष्ट करण्याची योजना आणली होती. त्यासाठी काही आर्थिक प्रोत्साहनही देऊ केले होते; पण त्यास फार प्रतिसाद मिळाला नाही. दिल्लीमधील लाखो वाहनांमधून आणि कारखान्यांमधून बाहेर पडणारा धूर प्रदूषणाची समस्या तीव्र करतो. यावरून राजकारण नेहमी रंगते. आ-ताही दिल्लीच्या हवेची गुणवत्ता घसरण्याबद्दल भाजपचे सरकार आधीच्या 'आप'च्या सरकारला व माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दोषी धरत आहे. गेल्या मे महिन्यातच 'ए क्यू आय' ५०० वर गेल्याचे निदर्शनास आणून केजरीवाल यांनी भाजप सरकारला धारेवर धरले होते. दोष ढकलण्याच्या या राजकीय खेळा-तून दिल्लीच्या जनतेस दिलासा मिळत नाही. दिल्लीच्या बाहेर नोंदलेल्या तसेच प्रदूषणाचे 'बी एस -५' हे मानक पूर्ण न करणार्‍या वाहनांना दिल्लीत प्रवेश बंदी केल्याने हा प्रश्न सुटणार नाही. जगातील अति प्रदूषित शहरांपैकी बहुसंख्य शहरे भारतात आहेत हे अनेकदा प्रसिद्ध झाले आहे. दिल्ली, नोइडा यांचा क्रमांक त्यात वरचा आहे. वाहनांच्या व औद्योगिक धुराने कार्बन डायऑक्साइड व कार्बन मोनो ऑक्साइड असे वायू हवेत मिसळतात. त्यामुळे दिल्लीसह अनेक शहरांची हवा विषारी बनली आहे. मानवी आरोग्यास त्याचा गंभीर धोका निर्माण होतो. दिल्लीत श्वसनासंबंधीचे आजार वाढल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले आहे. सततचा खोकला, ब्रॉन्कायटिस असे विकार असणार्‍या रुग्णांच्या संख्येत गेल्या काही दिवसांत ९० टक्के वाढ झाल्याचे दिल्लीच्या डॉक्टरांनी म्हटले आहे. ऑक्टोबरमध्ये पाणी फवारण्याचा प्रयोग सरकारने केला; पण त्याने वायू प्रदूषण कमी झाले नाही. हवा शुद्धीकरण यंत्रे देखील समस्या कमी करू शकत नाहीत. अशी लाखो यंत्रे शहरभर बसवणे दुरापास्तही आहे. दिल्लीतील प्रत्येक वाहन वीज किंवा गॅसवर चालणारे असावे अशी सक्ती करणेही अवघड आहे, कारण तेवढी वाहने आहेत कोठे? सध्या तरी विषारी हवेत जगणे दिल्लीकरांच्या नशिबी आहे.

# संतुलित दिनचर्या–आनंदी जीवनाचे रहस्य

अजित बी. खाडिलकर, सचिव,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

देवाने आपल्यापैकी प्रत्येकाला दिवसाचे समान २४ तास दिले आहेत. आठवड्यातील प्रत्येक दिवस, महिना आणि वर्ष या काळात आपल्या आपल्या नोकरीच्या स्वरूपानुसार नियमित दिनचर्या पाळावी लागते. दिवसाचे योग्य संतुलीत काम, आपले छंद, आवडी आणि शेवटी विश्रांती व झोप यामध्ये असणे आवश्यक आहे. ही दिनचर्या प्रत्येकाने नियमितपणे पाळली पाहिजे. आपल्या जीवनातील यश किंवा अपयश हे आपण प्रत्येक दिवसाचे व्यवस्थापन कसे करतो यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. यशस्वी आणि अयशस्वी व्यक्तींमधील फरक फार सूक्ष्म असतो आणि तो फक्त आपण दिवसातील २४ तास कसे घालवतो यावर ठरतो.आपल्या दैनंदिन जीवनात ८ + ८ + ८ हे सूत्र सर्वांनी पाळले पाहिजे. दिवसाचे तीन समान भाग प्रत्येकी ८ तासांचे करणे आवश्यक आहे. पहिले ८ तास आपण आपल्या कार्यस्थळी घालवतो, जे आपल्या उपजीविकेचे व आर्थिक आधाराचे मुख्य साधन आहे. पुढील ८ तास वैयक्तिक जीवन, कुटुंब, मित्र, आरोग्य, नाती, छंद यासाठी असावेत. शेवटचे ८ तास केवळ विश्रांती व शांत झोपेसाठी असावेत. या तीनपैकी कोणत्याही एका वेळेत जरी थोडा अडथळा आला, तरी त्याचा परिणाम लगेच पुढील वेळेवर दिसून येतो. आपला प्रयत्न असा असावा की प्रत्येक ८ तास अर्थपूर्ण, ओळख निर्माण करणारे आणि आठवणीत राहणारे असावेत. नोकरीतील ८ तास अत्यंत महत्त्वाचे असतात. या काळात आपल्याला सहकारी, पुरवठादार, विविध संस्था व वरिष्ठांशी संवाद साधावा लागतो. प्रत्येकाशी संतुलन राखण्यासाठी वेगळी कौशल्ये आवश्यक असतात. कार्यस्थळी आपण प्रामाणिक, वेळेचे पालन करणारे, निष्ठावान, परिपक्व, शांत, जबाबदार, उपयुक्त, विश्वासार्ह, सहकार्यशील, व्यावसायिक, नम्र, योग्य पोशाख पाळणारे, गॉसिप टाळणारे व पुढाकार घेणारे असलो, तर कार्यस्थळावरील वेळ निश्चितच संस्मरणीय व फलदायी ठरेल. वरील गुणधर्म हळूहळू पण, निश्चितपणे विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकदा हे जीवनपद्धती म्हणून स्वीकारले की त्याचे लाभ अमूल्य असतात. आपल्याला केवळ इतरांकडून नव्हे तर स्वतःकडूनही आदर मिळतो आणि संस्थेतील प्रगती वेगाने होते. नोकरीनंतरचा वेळ हा गुणवत्तापूर्ण असावा. या वेळेत नाती, कुटुंब, मित्र, छंद, खेळ, संगीत, चालणे, फिटनेस, आवड, स्वतः:ची काळजी, टी.व्ही., सोशल मिडिया, मोबाईल यासाठी वेळ द्यावा. आपल्या जीवनशैली, कुटुंब, संस्कार व संस्कृतीनुसार यापैकी काही गोष्टी हळूहळू विकसित करता येतात. या छंदांमुळे समाधान, अंतरिक आनंद आणि एकूणच विश्रांती व संतुलन मिळते. मैत्रीभाव, करुणा, आनंद व समत्व दाखवल्याने आनंद प्राप्त होतो. मन शांत, तणावमुक्त आणि शारीरिक व मानसिक शांततेत असेल तेव्हा विश्रांती मिळते. योग, ध्यान, प्राणायाम आणि एकांत यामुळे मन व शरीराला नेहमीच आराम मिळतो. वरील दिनचर्येसोबतच चांगल्या सवयी, योग्य आहार, काळजी आणि देवप्रार्थनेसाठी वेळ काढल्यास आपल्या जीवनातील प्रत्येक दिवस संस्मरणीय बनेल. चला, आपण सर्वजण ८ + ८ + ८ या सुवर्णनियमाचे पालन करूया आणि त्याचे लाभ मिळवूया.



## आनंदी जीवनासाठी चार नियम...

- ❒ नेहमी कृतज्ञता व्यक्त करा
- ❒ यशाची स्वतः:ची व्याख्या ठरवा
- ❒ आपल्या नियंत्रणातील गोष्टींवर लक्ष केंद्रित करा
- ❒ शेवटचे ८ तास आत्मपरिक्षण, विश्रांती आणि शांत झोपेसाठी असावेत.

# दररोज अति प्रमाणात काजू खाता मग होईल नुकसान

अनेकांना ड्रायफ्रुट्स खायला खूप आवडतात. त्यापैकी चवीला काहीसा गोड काजू खूप लोकांना आवडता आहे. काजूचा वापर मिठाई बनवण्यापासून ते डाएटसाठीही केला जातो. काजू पौष्टिक घटकांनी समृद्ध असून, शरीराला भरपूर ऊर्जा देतो. काजूमध्ये मोठ्या प्रमाणात प्रोटिन असतं. काजू व्हिटॅमिन, खनिजं, फायबर आणि अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत आहे. हे खूप चविष्ट असल्यामुळे बरेच लोक ते खाताना प्रमाणाकडे लक्ष देत नाहीत. तुम्हालाही काजू आवडत असतील तर तुम्ही एका दिवसात किती काजू खाऊ शकता हे माहीत असणं गरजेचं आहे. कारण जास्त प्रमाणात काजू खाल्ल्याने आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. काजूचे अनेक फायदे आहेत हे नाकारता येत नसले तरी त्याचे अतिसेवन काही आरोग्य समस्यांना आमंत्रण देऊ शकते.

काजू खाण्याचे फायदे :

काजूमध्ये पोषकतत्त्वं असतात, ज्यामुळे ते डोळ्यांसाठी खूप फायदेशीर आहे. यासोबतच ते हृदयाचे आरोग्य चांगले ठेवते आणि कॅन्सरसारख्या धोकादायक आजारांपासून बचाव करते. काजू खाल्ल्याने केस लांब आणि सुंदर होतात. काजू दात आणि हिरड्यांच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. काजू खाल्ल्याने मेंदूवर सकारात्मक प्रभाव पडतो आणि वजन कमी करण्यासही मदत होते.



जास्त काजू खाल्ल्याने काय होते :

अॅलर्जी : खूप जास्त प्रमाणात काजू खाल्ल्याने अॅलर्जी होऊ शकते. त्वचेवर लाल डाग पडू शकतात किंवा त्वचेवर खाज येऊ शकते. अॅलर्जीमुळे सर्दी होऊ शकते आणि ओठांना सूज येऊ शकते.

कॉन्स्टिपेशन : जास्त प्रमाणात काजू खाल्ल्याने कॉन्स्टिपेशन होऊ शकतो. यामुळे गॅसची समस्या देखील होऊ शकते.

वजन वाढू शकते : जास्त प्रमाणात काजू खाल्ल्याने वजन वाढू शकते. त्याम ुळे काजूचे सेवन मर्यादित प्रमाणातच करा. जर एखाद्या डॉक्टर किंवा आयुर्वेदिक एक्सपर्ट तुम्हाला काजू खाण्याचा सल्ला दिला असेल तर त्यांच्याकडून काजू किती प्रमाणात खायचे हेही जाणून घ्या.

भाजलेले काजू खाल्ल्याने आरोग्याला पोहोचते नुकसान : जर तुम्हाला भाजलेले खारट काजू खायला आवडत असतील तर त्याच्या प्रमाणावर लक्ष ठेवा. कारण त्यात तेल आणि मीठ जास्त प्रमाणात असते. त्यामुळे ते अती जास्त प्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला नुकसान होऊ शकते.

## दिसायला अतिशय छोटा असणाऱ्या तिळाचे मोठे फायदे...

### डॉक्टर टीप्स

हिवाळा स्वास्थासाठी चांगला मानला जातो. थंडीच्या दिवसांत अशा काही गोष्टी मिळतात ज्या आपल्या शरीरासाठी फायदेशीर मानल्या जातात. त्यापैकीच एक म्हणजे तीळ. तीळ एक असा खाद्यपदार्थ आहे, ज्यात अनेक गुणकारी घटक असतात. दिसायला अतिशय छोटा असणाऱ्या तिळाचे मोठे फायदे आहेत. थंडीत तिळाचं सेवन शरीरासाठी उत्तम मानलं जातं. तिळामुळे शरीराला उष्णता मिळण्यास मदत होते. तर आपल्या शरीराची हाडंदेखील मजबूत करते. तिळाचं सेवन आरोग्यासह, सौंदर्यासाठीही फायदेशीर ठरतं. आयुर्वेदानुसार, तिळाचं सेवन करणं शक्तिवर्धक आणि प्रभावी आहे. तिळाचे दोन प्रकार असतात. एक सफेद तीळ आणि दुसरे काळे तीळ. जगभरात तिळाच्या तेलाचा वापर केला जातो. तिळाच्या तेलात त्वचा आणि केसांचं सौंदर्य वाढवण्यासोबतच उपचार करण्याची गुणवत्ताही आहे.






## विनोद

एक वैतागलेला रोगी डॉक्टरला म्हणतो, 'डॉक्टर, तुम्ही गाढवावर इलाज करून पाहा.' त्यावर डॉक्टर शांतपणे म्हणतात, 'मग इतके दिवस काय करत होतो?'

## संदेश

Ladka ladki ko dekhne gaya,
unko baat krne k liye
akele bitha diya
girl-(darte hue)bhaiya aap
kitne bhai-behen ho
Boy-abhi tk to 3 the,ab 4
ho gye.

## सुविचार



भटक्या मनाच्या अवस्थेमध्ये डोळ्यांना काहीही दिसत नाही.

– पी. सायरस

### संस्कृत सुभाषित

विद्यावत: कुलीनस्य धनं याचि तुमिच्छत:।
कण्ठे पारावतस्येव वाक्करोति गतागतम्।।

अर्थ : कुलीन विद्वानांवर जेव्हा द्रव्य याचनेचा प्रसंग येतो, तेव्हा त्यांचे शब्द कबुतरासारखे कंठातच घुटमळतात.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. एखाद्या घरात कितपत टापटीप आहे हे अंगणाची स्थिती पाहून कळते (वा.प्र.)
८. आभाराचा शब्द
११. रोजची कमाई
१२. भरपेट जेवणानंतर पोटाची स्थिती
१३. राज्यकारभाराचे शहर
१५. हिंदीत पक्ष
१६. मैत्रीण
१७. कामाचा व्याप, खूप काम
२०. कुंकवाबरोबरचे पिवळे चूर्ण
२१. पद्धत
२३. रामदासस्वामींनी मारुतीच्या मूर्तीची स्थापना पाटणजवळील या गावात केली
२५. कोल्हापुरी दागिना
२६. ऋतू नसताना, बेमोसमी (बहुदा पाऊसच)
२८. सारस्वतांचा आहार
२९. याला सोडून संन्यासाला फाशी कशाला द्यायची?
३०. व्याकूळ करणारी वेळ आणि तसा आ-वाजही
३१. पृथ्वी
३३. विरोध, प्रतिबंध
३५. लाट, इच्छा
३७. भूकंप
३९. चटकन
४१. शिक्का, छाप
४२. विद्यामधील पांढरा झोंबणारा पदार्थ
४४. एकसारखे
४७. राबता, जा–ये
४९. नम्र, वाकलेला
५०. निलाजरा
५१. बरोबर, सह
५२. मोठा भाऊ
५३. घागर
५४. अग्नी, आग
५६. कामदेव
५७. हिस्सा, भाग
५८. घरातील मधली खोली
६०. श्री विष्णूचे छोटे रूप
६२. दैवी
६४. सापाची विषारी जात
६६. युवक
६८. प्रवाह
६९. महादेव
७२. मागणे, विनंती
७३. अकस्मात
७६. श्रीमंत
७७. कारस्थान
७८. एकदम जिवलग (दोस्त)
७९. उंच सखल नसलेले
८१. बारीक झणझण
८२. नासलेले
८४. वाद खुंटलेला
८५. गाय
८६. कुचका दाणा

## उभे शब्द

१. सर्वसाधारणपणे स्थिती सगळीकडे सारखी असते (म्हण)
२. गवंडी
३. 'चोर परिचयाचा असेल तर जिवालाही भीती' या अर्थाची म्हण
४. अंतरिक्ष
५. चद्रमुद्रा (करणे)
६. लोकांनी घातलेला विळखा
७. आभा, त्या
८. मालक
९. सोसाट्याचा वारा
१०. ओली भुसभुशीत जमीन
१४. अतिशय धाकात ठेवणे, कडक शिस्तीने वागविणे
१८. सर्वात खालचे पाताळ
१९. हिंदी चित्रपटातील हीरोचा आवडता गोड पदार्थ
२०. हाक, पुकारा
२२. त्याप्रमाणे
२४. अंतर, तफावत
२७. बांगड्यांचा व्यवसाय करणारा
३२. ओतप्रोत भरलेले
३४. समशेर
३६. आवाज, गोंगाट
३८. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४०. दुष्ट, भांडखोर
४३. बेकरीतील गोड बिस्किटे
४५. वर्ण
४६. मस्ती शमणे, नरम होणे
४८. जपानी चलन
५१. दोन नद्यांचे मीलन
५२. न्याय
५४. कुंभाराची भट्टी
५५. मेजवानी (हिंदी)
५६. असह्य वेदना
५९. दरवळ
६१. होडी
६३. श्वासोच्छवास
६५. रसाळ
६७. नाव नसलेले पंजातील बोट
७०. उंबरठा
७१. दिखाऊ, वरपांगी
७३. निरागस
७४. कोकणी खारोटी
७५. वाळवी
८०. वरवंट्याचा जोडीदार
८३. जुगार

## आडवे उत्तर

१.घराची ओज अंगण सांगते ८.धन्यवाद ११.रोज १२.तट्ट १३.राजधानी १५.दल १६.सखी १७.रामरगाडा २०.हळद २१.रीत २३.चाफळ २५.साज २६.अवकाळी २८.मासे २९.चोर ३०.कातर ३१.रसा ३३.हरकत ३५.लहर ३७.धरणीकंप ३९.लवकर ४१.ठसा ४२.चुना ४४.वारंवार ४७.जाणेयेणे ४९.लीन ५०.निगरगट्ट ५१.संग ५२.दादा ५३.कळशी ५४.आग ५६.मदन ५७.वाटा ५८.माजघर ६०.वामनावतार ६२.ईश्वरी ६४.मणेर ६६.तरुण ६८.ओघ ६९.सदाशिव ७२.याचना ७३.अचानक ७६.मालदार ७७.खलवत ७८.जानी ७९.सपाट ८१.स्वरव ८२.नासका ८४.खुरटा ८५.गो ८६.खवट

## उभे उत्तर

१.घरोघरी मातीच्या चुली २.राज ३.ओळ-खीचा चोर जिवानिशी मारी ४.अंतराळ ५.गट्टम ६.गराडा ७.तेज ८.धनी ९.वादळ १०.दलदल १४.धारेवर धरणे १८.रसातल १९.गाजर हलवा २०.हळी २२.तसे २४.फरक २७.कासार ३२.आकंठ ३४.तलवार ३६.वर ३८.पसायदान ४०.कजाग ४३.नानकटाई ४५.रंग ४६.रग जिरणे ४८.येन ५१.संगम ५२.दाद ५४.आवा ५५.दावत ५६.मरण यातना ५९.घमघमाट ६१.तारु ६३.श्वसन ६५.रसदार ६७.अनामिका ७०.दारवठा ७१.वरवर ७३.अजाण ७४.चानी ७५.कसर ८०.पाटा ८३.सट्टा

## जात वैधता पडताळणीसाठी मनपात स्वतंत्र कक्षाची स्थापना

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर मनपा सार्वत्रिक निवडणुकीत जात वैधता करण्यासाठी अर्ज स्वीकारून ते अर्ज जात पडताळणी समितीकडे पाठवण्यासाठी लातूर मनपात स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

मनपाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार आयोगाने निश्चित केलेल्या आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारंचे जात वैधता करून घेणे आवश्यक असते. त्यासाठी अर्ज करावा लागतो. असे अर्ज स्वीकारून ते जिल्हा जात पडताळणी समितीकडे पाठविण्यासाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात हा स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाच्या माध्यमातून दि.२२ डिसेंबर ते ३० डिसेंबर या काळात अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. हे अर्ज जिल्हा जात पडताळणी समितीकडे पाठविले जाणार आहेत.

आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज या कक्षाकडे आवश्यक कागदपत्रांसह संतोष लाडलापुरे व फजल शेख यांचेकडे सादर करावेत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## रेल्वेने नाताळ व नववर्षानिमित्त गाडी क्र. २२११५/२२११६ लोकमान्य टिळक टर्मिनस - करमळी- लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेसची सेवा मडगाव पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला



**सोलापूर/प्रतिनिधी :** नाताळ व नववर्षाच्या काळात प्रवाशांच्या सोयीसाठी रेल्वे प्रशासनाने गाडी क्र. २२११५/२२११६ लोकमान्य टिळक टर्मिनस - करमळी - लोकमान्य टिळक टर्मिनस एक्सप्रेसची सेवा दिनांक १८.१२.२०२५ ते १५.०१.२०२६ या कालावधीत मडगावपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहेत : -

गाडी क्र. २२११५ साप्ताहिक एक्सप्रेस दर गुरुवारी लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथून ००.५० वाजता सुटेल व त्याच दिवशी ११.१५ वाजता मडगाव येथे पोहोचेल. गाडी क्र. २२११६ साप्ताहिक एक्सप्रेस दर गुरुवारी मडगाव येथून १३.५० वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी ००.१० वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई येथे पोहोचेल.

थांबे: ठाणे, पनवेल, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, कुडाळ आणि करमळी

संरचना: एक प्रथम वातानुकुलीत, ३ वातानुकुलीत द्वितीय, १५ वातानुकुलीत तृतीय, १ पॅन्ट्री कार आणि २ जनरेटर कार. आरक्षण: वरील गाड्यांसाठीची आरक्षणे सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in या संकेतस्थळावर खुली आहेत.

या विशेष गाड्यांचे सविस्तर वेळापत्रक व थांबे जाणून घेण्यासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा. प्रवाशांनी या बदलाची नोंद घ्यावी व दिलेल्या सुविधेचा लाभ घ्यावा.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे प्रस्तुत शाळा संसद २०२५-२६ मध्ये सहभाग

**लातूर/प्रतिनिधी :** लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये इयत्ता आठवीमध्ये शिकत असलेले विद्यार्थी श्रुष्टी गोपाळराव सोळंके, सिद्धांत दत्तात्रय आलमले आणि ओम अभिमन्यू वाघमारे यांनी दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे प्रस्तुत शाळा संसद २०२५-२६ मध्ये सहभाग नोंदवला.

दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे प्रस्तुत शाळा संसद २०२५-२६ आयोजित स्पर्धा सोलापूर येथे संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये विविध शाळांमधील अनेक स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेसाठी लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी श्रुष्टी गोपाळराव सोळंके, सिद्धांत दत्तात्रय आलमले आणि ओम अभिमन्यू वाघमारे यांची निवड झाली होती.

या स्पर्धेमध्ये लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी श्रुष्टी गोपाळराव सोळंके, सिद्धांत दत्तात्रय आलमले आणि ओम अभिमन्यू वाघमारे यांची शाळा संसद २०२५-२६ साठी निवड झाल्याबद्दल त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार व कौतुक करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.

# दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे पाच दिवसीय 'स्किल बिल्ड युथ एम्पॉवरमेंट' प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न






**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग व इंटरनॅशनल बिझनेस मशीन () आणि मॅजिक बस इंडिया फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ''स्किल बिल्ड युथ एम्पॉवरमेंट'' या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने राबविण्यात आलेले हे शिबिर अत्यंत उपयुक्त ठरले.

या पाच दिवसीय प्रशिक्षण शिबिराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मॅजिक बस इंडिया फाउंडेशन, पुणे येथील डेव्हलपमेंट प्रोफेशनल श्री. विनोद गायकवाड, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. रोहित सारडा तसेच शिबिर समन्वयक डॉ. बालाजी शेटकार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या विनोद गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना आजच्या बदलत्या सामाजिक व व्यावसायिक वातावरणात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या जीवनकौशल्यांचे महत्त्व सखोलपणे स्पष्ट केले. केवळ शैक्षणिक ज्ञान पुरेसे नसून व्यक्तिमत्त्व विकास, सकारात्मक दृष्टिकोन, प्रभावी संवाद कौशल्ये व आत्मविश्वास या घटकांची जोड अत्यावश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

शिबिरात महाविद्यालयातील बी. फार्म व एम. फार्मचे सुमारे १२० विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रशिक्षणा दरम्यान ए.आय.प्रशिक्षण,सेल्फ अवेअरनेस, सेल्फ कॉन्फिडन्स, कम्युनिकेशन स्किल, टीमवर्क, गोल सेटिंग, ॲक्टिव्ह लिसनिंग, टाईम मॅनेजमेंट, हेल्दी रिलेशनशिप तसेच स्ट्रेस मॅनेजमेंट या विषयांवर सखोल व आशयपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. विविध कृती आधारित उपक्रम, समूहचर्चा, प्रश्नोत्तर सत्रे व प्रात्यक्षिकांमुळे विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग लाभला.

अशा या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, निर्णय क्षमता व नेतृत्व गुण विकसित होण्यास मदत झाली. तसेच करिअरच्या दृष्टीने आवश्यक असलेली व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची दिशा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक सक्षम व रोजगारक्षम होण्यास निश्चितच हातभार लागेल, असा विश्वास प्राचार्या डॉ. क्रांती सातपुते यांनी व्यक्त केला.

महाविद्यालयाच्या या उपक्रमाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदरावजी सोनवणे, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्यजी सोनवणे तसेच कोषाध्यक्ष संजयजी बोरा यांनी आयोजक व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी व रोजगारक्षम कौशल्ये वृद्धिंगत करण्यासाठी भविष्यातही अशा उपयुक्त व मार्गदर्शक प्रशिक्षण उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# सकारात्मक विचारांची पेरणी करा: डॉ. गणेश लहाने

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील बीसीए, बीबीए, एमसीए व एमबीए प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ 'आरंभ २०२५' उत्साहात संपन्न झाला. या समारंभाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नृत्य, मिमिक्री, शेलापागोटे, रॅम्प वॉक तसेच मुलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते.




कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. साईनाथ उमाटे उपस्थित होते. तसेच आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. टी. चव्हाण, बीसीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते, एनएसएस विभागप्रमुख डॉ. विशाल वर्मा, क्रीडा विभागप्रमुख डॉ. अशोक वाघमारे तसेच ग्रंथपाल डॉ. विठ्ठल जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक बीसीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी व बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. गणेश लहाने यांनी विद्यार्थ्यांना ''सकारात्मक विचारांची पेरणी करूनच जीवनात यश प्राप्त करता येते'' असा मौलिक संदेश दिला.

या स्वागत समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. क्षितिज कांबळे यांनी केले, तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अक्षय पवार व प्रा. अजय चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीसीए व बीबीए विभागातील सर्व प्राध्यापकांनी मोलाचे सहकार्य केले. विशेष म्हणजे दयानंद वाणिज्य महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांची उपस्थिती या कार्यक्रमाला लाभली.

राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## मिरा भाईंदरमध्ये बिबट्या दिसल्याने खळबळ, हल्ल्यात ७ जण जखमी, १ गंभीर

**मुंबई/प्रतिनिधी :** भाईंदरमधील तलाव रोड परिसरात आज अचानक बिबट्या दिसल्याने मोठी खळबळ उडाली आहे. मानवी वस्तीत आलेल्या या बिबट्याने एका कुटुंबावर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी मोबाईलमध्ये बिबट्या निर्धास्तपणे फिरतानाचे फोटो, व्हिडीओ काढले आहेत. बिबट्या एका इमारतीमध्ये शिरल्याचेही या व्हिडिओत स्पष्टपणे दिसत आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि वनविभागाला तातडीने कळवण्यात आले असून प्रशासन सतर्क झालं आहे.

परिसरात बिबट्या असल्याने नागरिकांना घराबाहेर न पडण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. सध्या परिसरात शोधमोहीम सुरू असून, बिबट्याला सुरक्षितपणे पकडण्यासाठी वनविभागाचे पथक कार्यरत आहे. मानवी वस्तीत बिबट्या शिरल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान बिबट्याच्या हल्ल्यात ७ जण जखमी झाले असून, एक जण गंभीर आहे. जखमींना उपचारासाठी नेण्यात आलं आहे.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ फेब्रुवारी २६ च्या प्रथम आठवड्यात

## विद्यार्थ्यांना मराठीतील नाव पडताळणीचे आवाहन

**नाशिक/प्रतिनिधी:** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ येत्या फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी येत्या २८ डिसेंबर २०२५ पर्यंत विद्यापीठाकडे नोंदवलेल्या आपल्या मराठी नावाची पडताळणी करण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

डिसेंबर २०२४. फेब्रुवारी / मार्च २०२५ आणि मे / जून २०२५ या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर मराठी भाषेतील (देवनागरी लिपी) त्यांचे नाव अचूक यावे याकरीता नावाची पडताळणी व दुरुस्तीकरीता विशेष सुविधा विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.




प्रवेश अर्ज भरतेवेळी काही विद्यार्थी आपल्या नावाची मराठीतील नोंद अचूक करीत नाहीत, असे विद्यापीठाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार संबंधित विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर त्यांच्या मराठीतील नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी नाव पडताळणी व दुरुस्तीचे अभियान विद्यापीठामार्फत राबविण्यात येत आहे. उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना दीक्षांत सोहळ्यात देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रासाठी आपले मराठी नाव पडताळणी आणि दुरुस्तीची सुविधा विद्यापीठाच्या https://31convocation.ycmou.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळास भेट देवून आपले मराठी नाव तपासून त्यात काही दुरुस्ती असल्यास ती येत्या दिनांक २८ डिसेंबर २०२५ पर्यंत करावी.

तसेच विद्यार्थ्यांनी आपले मराठी नाव दुरुस्ती न केल्यास भविष्यात त्यांच्या प्रमाणपत्रावरील मराठीतील नाव दुरुस्तीसाठी विद्यापीठामार्फत शुल्क आकारण्यात येईल. त्यामुळे संबंधित सर्व विद्यार्थांनी दिलेल्या मुदतीत विद्यापीठ संकेतस्थळास भेट देऊन आपल्या पदवी प्रमाणपत्रावरील मराठी नावाचा तपशील अचूक असल्याची खात्री करावी व आवश्यक असल्यास त्यात योग्य ती दुरुस्ती करावी. या संदर्भात काही अडचण असल्यास (०२५३) २२३०७३४ या दूरध्वनी क्रमांकावर व sfc@ycmou.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे आणि परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.

# लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये वेळा अमावास्या सण साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये वेळा अमावास्या सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने यांच्या हस्ते पाच पांडवाची पुजा करून दर्शन घेतले. वेळा अमावास्या (मराठी ग्रामीण भाषेत येळवस) हा मूळ कर्नाटकी असणारा पण महाराष्ट्र मध्ये नांदेड उस्मानाबाद, लातूर आणि बीड जिल्ह्यातील परळीचा उर्वरित भाग येथे साजरा होणारा कृषिप्रधान उत्सव आहे.

या प्रसंगी शाळेच्या समन्वयिका नम्रता झांबरे यांनी वेळा अमावास्या सणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. मार्गशीर्ष अमावास्येला हा उत्सव साजरा केला जातो. पेरणीनंतर येणाऱ्या सातव्या अमावास्येला हा उत्सव होतो. भारतीय संस्कृती ही प्रामुख्याने कृषी संस्कृती आहे. बाजरीचे मुटके, ज्वारीचे मुटके, पुरणपोळी यांचा नैवेद्य करतात. भज्यांमधे वाटाणे, दूध, तुर, मेथी, कोथिंबीर, गाजर, वांगे, आले, लसूण यांचे सुरेख मिश्रण असल्याने ती चविष्ट असतात. शेतात आल्यावर शेतकरी आपल्या डोक्यावर मडके घेतो व घोंगड्याच्या खोळीने झाकतो. तसे करून तो संपूर्ण शेताच्या बांधावरून शेताला फेरी मारतो. शाळेचे विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी एकमेकांना वेळा अमावास्या या कृषिप्रधान उत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका संगीता शेटे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मातोश्री वृद्धाश्रमला रुग्ण कल्याण समिती व सुरक्षा समितीच्या सदस्यांची भेट..




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- धाराशिव येथील एमआयडीसी परिसरात डॉ.विकास गपाट यांनी मातोश्री वृद्धाश्रम चालु केले असुन सध्या या वृध्दाश्रमात चार महिला व सहा पुरुष आहेत,यांची देखभाल चांगल्या प्रकारे केली जाते,सध्या हे वृध्दाश्रम विना अनुदानित असुन केवळ मानवतेच्या कल्याणासाठी ज्यांना मुले असुनसुद्धा त्यांच्या आईवडिलांना सांभाळत नाहीत,अशा निराधार वयोवृद्धांना या मातोश्री वृद्धाश्रम आधार देत आहे,या वृध्दाश्रमला रुग्ण कल्याण समिती व सुरक्षा समितीच्या सदस्यांनी भेट देऊन पाहणी केली, वृद्धाश्रमातील स्वच्छता,पाण्याची सोय, बाथरुम,किचन,आरोग्यासाठी प्राथमिक औषधोपचारची व्यवस्था, मनोरंजनासाठी टिव्ही, फेरफटकासाठी मैदान,मंदिर तर योग साधना, मार्गदर्शन,अशा प्रकारची माहिती मातोश्री वृद्धाश्रमचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विकास गपाट यांनी दिली, समितीच्या सदस्यांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन केले, वयोवृद्ध महिला व पुरुष यांच्याशी सदस्यांनी चर्चा केली,नगर,पुणे मुंबई व इतर ठिकाणचे हे वृध्द आहेत.समितीच्या वतीने फळे त्यांना देण्यात आली,यावेळी समितीचे सदस्य अब्दुल लतीफ,सदस्य गणेश वाघमारे,आरोग्य मित्र रौफ शेख, समाजसेवा (वैद्यकीय) अधिक्षक नवनाथ सरवदे, सहाय्यक वैद्यकीय अधिक्षक महेश अटकळ, सामाजिक कार्यकर्त्या आशाताई कांबळे, व्यवस्थापक अनुजा पानसरे अन्य इतर उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी यांना बुध्दिस्ट मायनॉरीटी मिशनच्या वतीने मागण्याचे निवेदन



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव येथे दि. १८/१२/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन सभागृहात 'अल्पसंख्याक हक्क दिन' साजरा करण्यात आला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी विष्णु ठोंबरे तसेच अल्पसंख्याक दिन कार्यक्रमाला अल्पसंख्याक मधील मुस्लिम, ख्रिश्चन, बुध्दीस्त, शिख, पारसी, जैन या समाजातील जिल्हाभरातील सामाजिक कार्यकर्ते मोठया प्रमाणात उपस्थित होते. याप्रसंगी विविध समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या अडचणी व सवलती यावर विचार मांडले. यावेळी बुध्दिस्ट मायनॉरीटी मिशन धाराशिवचे जिल्हा प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण प्राप्त कामगार नेते शंकर का. खुने, समाजभूषण ड. ज्योती बडेकर, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर माळाळे, यांनी या कार्यक्रमात जिल्हा नियोजन अधिकारी यांना व अप्पर जिल्हाधिकारी यांना मागण्याचे निवेदन दिले यामधील मागण्या पुढीलप्रमाणे.

बौध्द अल्पसंख्यांक विकास आर्थिक महामंडळाची स्थापना करण्यात यावी, बौध्द समाजातील अल्प उत्पन्न गटातील व्यक्तींचा आर्थिक व सामाजिक विकासासाठी अनुदान उपलब्ध करून देण्यात येऊन स्तर सुधारण्यासाठी योग्य अशा उपाययोजना, उपक्रम राबविण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, युवक व महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी व्यापार व उद्योग सुरू करता यावेत यासाठी या महामंडळाकडून अर्थ पुरवठा करता यावा, यासाठी विविध योजना तयार करुन प्रत्यक्ष लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा बौध्द समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना पायाभुत सोई सवलती पुरविण्यासाठी अनुदानात रुपये ३० लाखांपर्यंत वाढ करण्यात यावी, बौध्द भिख्खूंना राज्यात रेल्वे व बस प्रवास करण्यासाठी मोफत प्रवास योजना राबविण्यात यावी.तसेच त्यांना खाजगी रुग्णालयात गंभीर आजारामुळे दाखल केल्यास तेथील झालेला खर्चात पुर्तता करण्यासाठी तरतूद करण्यात यावी, बौध्द धर्माचा प्रचार व प्रसार करणा-या संस्थांना प्रचार व प्रसार करण्यासाठी राज्य सरकारने योजना तयार करुन निधी उपलब्ध करून देण्यात यावा. सदरच्या मागण्या शिफारस करुन शासनाकडे सादर करण्याचे जिल्हा नियोजन अधिकारी यांनी आश्वासित केले. अशी माहिती प्रसिध्दीपत्रकात धाराशिव जिल्हा प्रतिनिधी शंकर का. खुने यांनी दिली.

# कळंब नगर परिषदेची रविवारी पाच राउंड मध्ये पूर्ण होणार मतमोजणी !

कळंब (प्रतिनिधी)- येथील नगर परिषद अंतर्गत सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी दि . ०२ दिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली असून सदरील मतदान प्रक्रियेची मतमोजणी ही दि . २१ रोजी रविवार सकाळी १० पासून सुरुवात होणार आहे . सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी मतमोजणी श्री. संत गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळंब येथे होणार आहे .मतमोजणी प्रकिया नियोजित वेळेत पार पडावी यासाठी कळंब नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे कळंब शहरातील १० प्रभागासाठी १० टेबलचे नियोजन करण्यात आले आहे. यामधील प्रभाग क्र.१,४,५,६,९व १० या प्रभागात २ मतदान केंद्र असल्याने २ राऊंड मध्ये मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईल व प्रभाग क्र.२,३,७ व ८ मध्ये ०३ मतदान केंद्र असल्याने ०३ राउंड मध्ये मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईल याबाबत नियोजन करण्यात आले आहे. मतमोजणी प्रक्रियेसाठी साधारण १० टेबलवर २० प्रशिक्षित कर्मचारी व १० वर्ग -४ मधील कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. तसेच संगणक व सारणी कामकाज साठी ६ कर्मचारी इतर कामासाठी ८ कर्मचारी याची नेमणूक करण्यात आली आहे. पोलिस प्रशासनाने उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार,पोलीस निरीक्षक अजित चिंतले, सहाय्यक पोलीस निरीक्षक-४, पोलीस उपनिरीक्षक-३, पोलीस कर्मचारी -७५ व होमगार्ड -५० असे मिळून १३३ पोलीस कर्मचारी यांची बंदोबस्तासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरील सर्व मतमोजणी प्रक्रियेवर निवडणूक निर्णय अधिकारी कळंब नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ तथा तहसीलदार हेमंत ढोकले, सहा .निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद , श्रीमती मंजुषा गुरमे व अति. सहा .निवडणूक निर्णय अधिकारी गोकुळ भराडीया यांच्या नियंत्रणा खाली ही मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे.

# प्रा. सत्येंद्र राऊत यांच्या निसर्ग काव्यसंग्रहाची जागतिक रेकार्डबुक मध्ये नोंद

अणदूर (विजय पिसे)- येथील जवाहर महाविद्यालय संस्कृत विभाग प्रमुख व ग्रीन क्लब समन्वयक डॉ. सत्येंद्र राऊत संपादित निसर्ग काव्यसंग्रहाची -उए या संस्थेने जागतिक रेकॉर्डबुकमध्ये नोंद घेतली. जागतिक पातळीवर या काव्यसंग्रहाची निवड झाल्याबद्दल -उए या संस्थेच्या डॉ. वंदना गुप्ता व अनिता गुप्ता यांच्या हस्ते मुंबई येथील ताज महाल पॅलेसमध्ये प्रा.राऊत यांना जागतिक रेकार्डबुकचे प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्ये असे आहेत कि महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील १३५ कवी व कवयित्रींच्या निसर्ग विषयावरील कविता आहेत.या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून समाजात निसर्गाविषयी आत्मीयता व पर्यावरणाचे जतन करण्याचा अनमोल संदेश दिला गेला आहे. यात शैक्षणिक, सामाजिक व सिने क्षेत्रातील मान्यवरांचे मनोगत आणि शुभेच्छा सर्वांसाठी प्रेरणादायक आहेत. हा काव्यसंग्रह प्रत्येक लेखक, शिक्षक, विद्यार्थी, कवी व निसर्गप्रेमींना नक्कीच प्रेरणा देणारा व आवडणारा आहे. अणदूर येथील प्रा. डॉ. सत्येंद्र राऊत व सहशिक्षिका दीपमाला खडके आणि ऐश्वर्या कदम यांनी हा काव्यसंग्रह विचारपूर्वक संपादित केला असून या तिन्ही संपादकाच्या प्रयत्नांमुळे अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी साहित्याची निर्मिती झाली आहे. या काव्यसंग्रहाची जागतिक पातळीवर नोंद झाल्याबद्दल

संस्थेचे सचिव मा. रामचंद्र दादा आलुरे व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रा.भालचंद्र बिराजदार व ज्येष्ठ विधीज्ञ श्री. लक्ष्मीकांत पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधु भगिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच आदर्श पत्रकार श्री. विजय पिसे सर यांनी सर्व संपादकांचे अभिनंदन केले.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

### धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ १ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# कुष्ठरोग शोध अभियान यशस्वी ; १९ लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी

धाराशिव (जिमाका)- कुष्ठरोगाचा लवकर शोध घेऊन वेळेवर उपचार केल्यास रोगाचा प्रसार रोखता येतो व कुष्ठरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो,या उद्देशाने जिल्ह्यात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत विशेष कुष्ठरोग रुग्ण शोध अभियान राबविण्यात आले.या अभियानाअंतर्गत जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर घरोघरी जाऊन तपासणी करण्यात आली.

हे अभियान यशस्वीरीत्या राबविण्यासाठी १७ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समितीची बैठक घेण्यात आली.या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व अधिकारी,कर्मचारी तसेच सर्वेक्षण पथक व स्वयंसेवकांना घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी करण्याच्या सूचना दिल्या.तसेच नागरिकांनी तपासणीसाठी येणाऱ्या पथकास सहकार्य करावे,असे आवाहन करण्यात आले.

अभियानासाठी 'ई-इन्स्पेक्ट' ॲप विकसित करण्यात आले असून, सर्वेक्षण पथक व पर्यवेक्षकांना घराच्या लोकेशनसह माहिती व फोटो ॲपवर अपलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या.तालुकास्तरावर तहसीलदार व गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

या अभियानांतर्गत ग्रामीण भागातील १०० टक्के लोकसंख्या तसेच शहरी भागातील निवडक लोकसंख्येची



तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले.पुरुषांची तपासणी पुरुष स्वयंसेवकांमार्फत,तर महिलांची तपासणी आशा व महिला आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात आली. यासाठी १२०२ सर्वेक्षण पथके तयार करण्यात आली असून,त्यांच्या पर्यवेक्षणासाठी २४० पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली.

ग्रामीण भागात दररोज सरासरी २० ते २५ घरे,तर शहरी भागात दररोज सुमारे ३० घरांचे सर्वेक्षण करण्यात आले.एकूण ३ लक्ष ९ हजार ५०० घरांना भेटी देऊन १५ लक्ष ७ हजार ९९६ नागरिकांची तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान तालुकानिहाय संशयित रुग्ण शोधण्यात आले असून,वैद्यकीय अधिकारी व कुष्ठरोग कर्मचाऱ्यांनी सखोल तपासणी करून नवीन कुष्ठरुग्णांचे निदान केले. शोधण्यात आलेल्या सर्व नवीन रुग्णांवर बहुविध औषधोपचार (MDT) सुरू करण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, रुग्णांच्या संपर्कात येणाऱ्या किमान ३० संपर्क व्यक्तींना रोगाचा प्रसार होऊ नये यासाठी 'रिफॅम्पिसीन' औषधाची एक मात्रा देण्यात येणार आहे.यामुळे कुष्ठरोगाचा पुढील प्रसार रोखण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

जिल्ह्यात अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे की नाही तसेच नियमित राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करण्यासाठी केंद्रीय कुष्ठरोग विभाग,नवी दिल्ली यांच्या सूचनेनुसार डॉ.प्रणिल कांबळे, रिजनल डायरेक्टर,आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय,आकुर्डी (पुणे) यांनी पथकासह दि. ९ ते ११ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्ह्याला भेट दिली.

या भेटीदरम्यान त्यांनी धाराशिव शहर,उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर, प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरुळ (तु.), उपकेंद्र गोविंदपूर,प्राथमिक आरोग्य केंद्र मंगरुळ (क) तसेच उपजिल्हा रुग्णालय कळंब येथे भेटी देऊन सर्वेक्षण व उपचारांची पाहणी केली. प्रत्यक्ष उपचार घेत असलेले रुग्ण, रोगमुक्त झालेले रुग्ण तसेच पुनर्रचनात्मक शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधण्यात आला. आशा कार्यकर्ती व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखतीही घेण्यात आल्या. कार्यक्रम केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रभावीपणे राबविला जात असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

लवकर निदान व नियमित औषधोपचाराने कुष्ठरोग निश्चितपणे बरा होतो.आनंदाची बाब म्हणजे धाराशिव जिल्ह्यात मागील पाच वर्षांत एकाही रुग्णास विकृती आलेली नाही.अभियानांतर्गत शोधण्यात आलेल्या रुग्णांमध्ये सांसर्गिक रुग्णांचे प्रमाण १७.७ टक्के,तर असांसर्गिक रुग्णांचे प्रमाण ८२.२ टक्के आहे.आरोग्य विभागाच्या अथक प्रयत्नांमुळे नवीन रुग्ण वेळेवर शोधून उपचार सुरू केले जात आहेत.

आरोग्य विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की,अंगावर फिकट पांढरे किंवा लालसर चट्टे दिसणे,हात-पाय सुन्न होणे, मुंग्या येणे,भुवया विरळ होणे,कानाच्या पाळ्या जाड होणे,मज्जातंतू दुखणे, हात-पायात अशक्तपणा येणे,बोटे वाकडी होणे,चालताना चप्पल सुटणे अशा लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये.

सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये कुष्ठरोगाची तपासणी व उपचार पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत. लक्षणे आढळल्यास गावातील आशा कार्यकर्ती,आरोग्य कर्मचारी किंवा जवळच्या शासकीय दवाखान्यात तात्काळ संपर्क साधावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

कुष्ठरोग हा अधिसूचित आजार असून, खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी त्यांच्या दवाखान्यात निदान झालेल्या सर्व नवीन कुष्ठरुग्णांची माहिती दोन आठवड्यांच्या आत संबंधित वैद्यकीय अधिकारी,तालुका आरोग्य अधिकारी व सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) धाराशिव यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे,असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी कळविले आहे.

खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी त्यांच्याकडे निदान झालेल्या नवीन कुष्ठरोगनांचा अहवाल संबंधित सादर केल्यामुळे खालील प्रमाणे शक्य होणार आहे.राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम अंतर्गत सर्व रुग्णांना सेवा मिळतील याची सुनिश्चिती करणे,उपचारानंतर गुंतागुंत किंवा विकृती निर्माण झालेल्या व्यक्तींची पुढील काळजी घेण्यास पाठपुरावा करणे, पुढील संक्रमणास प्रतिबंध करण्यासाठी निरोगी संपर्कांना केमोप्रोफीलॅक्सिस देणे सुलभ करणे व औषध प्रतिरोधक कुष्ठरोग रुग्णांचे निदान व व्यवस्थापन सहाय्य करणे या बाबी शक्य होणार आहे. असे सहाय्यक संचालक,(कुष्ठरोग) आरोग्य सेवा.धाराशिव यांनी कळविले आहे

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649